<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ९६/२०१७ मध्ये निशाणी ३४ खालील आदेश</u>

०१. वादिने सदरचा अर्ज हा मोरक्र/प्रकार/नियमीत कोर्ट कमिशनर प्रकरण/एमआरएन(छ.संभाजीनगर)०७९६१९ दिनांक ०६.११.२०२५ रोजीच्या मोजाणी अहवालाप्रमाणे प्रतिवादी क्र. ८ ते १० यांनी संगणमत करुन अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मुळ दाव्यात परीच्छेद क्र. ३अ, ५अ, १० व ११ मधील कलमामध्ये दुरुस्ती करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे वादीने मागीतलेली दुरुस्ती ही दाव्याशी निगडीत असुन न्यायालयीन आयुक्ताच्या अहवालावर अवलंबुन आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. प्रतिवादीने सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याविरुदध विनाजबाब चालवीण्यात येतो.

०२. वादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व पटलावरील कागदपत्र यांचे अवलोकन केले. प्रतिवादी व त्यांचे विद्वान वकिल गैरहजर असल्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याविरुदध विनायुक्तीवाद चालवीण्यात येतो.

०३. वादिने सदरचा दावा हा प्रतिवादींविरुद्ध जाहिर होउन मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. वादीच्या वादपत्राचे व नकाशाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते कि, प्रतिवादींनी दावामिळकतीवर अतिक्रमण केले आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये अतिक्रमणाचा वाद आहे. तसेच, वादीने त्याच्या वादपत्रामध्ये अतिक्रमणाचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे वादीने न्यायालयीन आयुक्त यांच्या मोजणी अहवालाप्रमाणे मागीतलेली दाव्यातील दुरुस्तीमुळे कोणत्याही स्वरुपाचा बदल होणार नाही. वादीने मागीतलेली दुरुस्ती ही सुनावणीपुर्वी मागीतली आहे. सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीला नवीन दावा दाखल करावा लागु शकतो. त्यामुळे दाव्याची संख्या वाढु शकते. त्यामुळे वरील कारणमिमांसेवरुन वादिचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>-: आदेश :-</u>**

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादिने मागणी केल्याप्रमाणे दाव्यात पुढील तारखेला दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.07.14 17:15:35 +0530

ठिकाण :- रेणापुर

दिनांक :- १४/०७/२०२६

(ज्ञा.म.गित्ते)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
रेणापुर